# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

## रामाआ-तक्रार क्र. बीएम- २२/२०२०

**तक्रारकर्ता श्री. ॲड. कपील सोनी**
5, Ramnath Mishra Compound, Yashwant Tawde Road,
Dahisar (East), Mumbai- 400 068.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी, आर/उत्तर,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, आरोग्य अधिकारी 'आर/उत्तर' विभाग यांचे कार्यालय,
संगीतकार सुधीर फडके उड्डाणपूलाखाली, जयवंत सावंत मार्ग, दहिसर (प), मुंबई-९२

**प्रथम अपिलीय अधिकारी**
बृहन्मुंबई महानगरपालिका, आरोग्य अधिकारी 'आर/उत्तर' विभाग यांचे कार्यालय,
संगीतकार सुधीर फडके उड्डाणपूलाखाली, जयवंत सावंत मार्ग, दहिसर (प), मुंबई-९२

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २५.०२.२०२०</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. प्रो.क्र. ३८७४/२०१८ रा.मा.आ. अपील क्र.१६०६/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. ३१.१२.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

१) *"अपिलार्थी यांनी दाखल केलेले व्दितीय अपील अर्ज कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून दाखल करण्यात येत आहेत.*

२) *सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०५.०२.२०२० रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात येईल."*

उक्त आदेशानुषंगाने अपिलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज तक्रार क्र. २१/२०२० मध्ये दाखल करण्यात आला असून सदर तक्रार अर्जावर दि. ०५.०२.२०२० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. परंतु दि.०५.०२.२०२० रोजीची सुनावणी तहकुब करण्यात आली असुन ती आज दि.२५.०२.२०२० रोजी आयोजित करण्यात आली आहे.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी वेळेची मागणी केली त्यांची मागणी मान्य करुन या प्रकरणी पुढील सुनावणी दि. २७.०३.२०२० रोजी दुपारी ०३.०० घेण्यात येईल.

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २५.०२.२०२०**

**रामाआ तक्रार क्र. बीएम- २२/२०२०**

**तक्रारकर्ता श्री. ॲड कपील सोनी**

**सुनावणी दिनांक : ३०.०६.२०२५ (In continuation of order dt २५.०२.२०२०)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित (व्ही.सी.व्दारे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी वेळची मागणी केली होती. त्यांची मागणी मान्य करुन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती.

आजच्या सुनावणी वेळी तक्रारकर्ता (व्ही.सी. माध्यमाव्दारे) व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. २७.०६.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, दि. २६.०२.२०२० रोजीच्या पत्रान्वये तक्रारकर्ता यांना आर/ उत्तर विभागाची रेस्टॉरंटची यादी देण्यात आलेली आहे. तक्रारकर्ता यांनी असे सादर केले की, दि. २६.०२.२०२० रोजीच्या पत्राची प्रत त्यांना अप्राप्त आहे. जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वी तक्रारकर्ता यांना पाठविलेली माहिती पुन्हा तक्रारकर्ता यांना नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात यावी.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

(Signature) ३०-६-२०२५

**मुंबई**
**दिनांक : ३०.०६.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**